# आरोग्य तपासणी शिबिर संपपन्न

डोंबिवली : बंगाली असोसिएशन ऑफ रीजन्सी इस्टेट येथे आरोग्य तपासणी शिबिर राबविण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक अशा बीएम आय (लठ्ठपणा), शुगर, मूत्रपिंडासाठीची तपासणी, जीइआरडी (अॅ सिडिटी), लिव्हर तपासणी, थायरॉईड विविध अशा बारा प्रकारच्या चाचण्या विनामूल्य करण्यात आल्या. या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्स आणि ओम हॉस्पिटलच्या डॉ. वंदना धाकतोडे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले होते. यावेळी जवळपास ५२ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या आरोग्य तपासणी शिबिराच्या वेळी प्रकल्प प्रमुख डॉ. वंदना धाकतोडे, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्सचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख, सेक्रेटरी साधना साळवी व इतर रोटरी सदस्य उपस्थित होते.

